# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - 18

## फ प्रभाग समिती

## सभावृत्तांत ( कार्यपत्रिका क्रमांक 07)

**दिनांक : 14/10/2021** **वेळ : सकाळी 11.30 वा .**

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ क्षेत्रीय कार्यालयाची मासिक सभा शुक्रवार दि.08/10/2021 रोजीची तहकूब मासिक सभा गुरुवार दिनांक 14/10/2021 रोजी सकाळी 11.30 वाजता फ क्षेत्रीय कार्यालयातील **" राजर्षी शाहू महाराज सभागृह "** येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/सदस्या उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. कुंदन अंबादास गायकवाड | सभापती |
| 2. | मा.साधना अंकुश मळेकर | सदस्या |
| 3. | मा.संजय बबन नेवाळे | सदस्य |
| 4. | मा. घोलप कमल अनिल | सदस्या |
| 5. | मा.उत्तम प्रकाश केंदळे | सदस्य |
| 6. | मा.पवळे सुमनताई मधुकर | सदस्या |
| 7. | मा.चिखले सचिन तुकाराम | सदस्य |

याशिवाय मा.श्री.सिताराम बहुरे–क्षेत्रीय अधिकारी, श्री.विजयकुमार काळे–कार्यकारी अभियंता (स्थापत्य), मा.संजय खाबडे-कार्यकारी अभियंता विद्युत),मा.रामनाथ टकले-कार्यकारी अभियंता(पाणी पुरवठा), मा.किशोर महाजन-कार्यकारी अभियंता झोनिपु(स्थापत्य), मा.महेंद्र चौधरी-प्रशासन अधिकारी तथा सचिव,मा. शिवाजी लोखंडे-लेखाधिकारी, मा.हनुमंत शिंदे-उपअभियंता(स्थापत्य), मा.सुनिल हरिदास-उपअभियंता(झोनिपु स्थापत्य), मा.रविंद्र सुर्यवंशी-उपअभियंता (बीआरटीएस),श्री विजयकुमार शिंदे-उपअभियंता(जलनि:स्सारण),मा.शेखर गुरव-उपअभियंता(ईडब्ल्यूएस), मा.सुधीर वाघमारे-प्रभारी सहा. आरोग्याधिकारी,श्री इदनानी नरेशकुमार - कार्यालय अधिक्षक, श्री भोईर ए.एन.-कनिष्ठ अभियंता (जलनि:स्सारण),श्री कुर्ले सी.जी.-कनिष्ठ अभियंता, श्री स्वामीजंगम जी.डी.-कनिष्ठ अभियंता(जलनि:स्सारण), श्री कुलकर्णी ए.ए..-कनिष्ठ अभियंता(पाणी पुरवठा) श्री शेख एस.के.-कनिष्ठ अभियंता(झोनिपु स्थापत्य), श्री लांडगे सतिश निवृत्ती-मुख्य् लिपिक, श्री कोटीयाना डी.एम.-आरोग्य निरिक्षक (पशुवैद्किय विभाग), श्री आढळे डी.एम.-उद्यान निरिक्षक, श्री एस.डी.रावते-सहा. हॉर्टीकल्चर सुपरवायझर इ.अधिकारी /कर्मचारी उपस्थित होते.

मा. सभापती, कुंदन अंबादास गायकवाड यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेची सुरुवात करणेस अनुमती दिली.

दिनांक ०२/०९/२०२१ रोजी स.११.३० वा. झालेल्या फ प्रभाग समितीच्या मासिक सभेचा सभावृत्तांत (कार्यपत्रिका क्रमांक ६) कायम करणेत येत असलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

(कृ.मा.प.)

मा.सभापती व उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालीलप्रमाणे ऐनवेळचे विषय सभेत दाखल करुन घेणेत आले.

**विषय क्रमांक १**-प्रशासन वि भागाकडील पत्र क्र. फक्षेका/२/कावि/११६/२०२१दिनांक १४/१०/२०२१ फ क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र.११ व प्रभाग क्र.१३ मधील खालील नमूद केलेल्या ठिकाणांना हॉकर्स झोन निश्चीतीस मान्यता देणेबाबत.

**प्रभाग क्रमांक ११.**

१) चेरी चौक स्पाईन रोड मधील जागा.
२) कृष्णा चौक स्पाईन रोड मधील जागा.
३) घरकुलमध्ये बसस्टॉपच्या मागील बाजूस .

**प्रभाग क्रमांक १३**

१) ठाकरे ग्राऊंडच्या बाजूला, यमुनानगर.
२) अंकुश चौक स्पाईन रोड मधील जागा.

**विषय क्रमांक २** -सन्मा.सदस्य् प्रा. उत्तम प्रकाश केंदळे यांचा दिनांक १४/०१०/२०२१ रोजीची प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक ११ मधील शरदनगर येथे हनुमान मदिर गल्ली क्रमांक ८ यास चौकास **"कै.तान्हाजी मारुती केंदळे (मा.पं.स.सदस्य, खेड तालुका ) चौक"** असे नामकरण करणेचे प्रस्तावास मान्यता देणे.

वरीलप्रमाणे ऐनवेळचे विषय दाखल करुन घेणेत आले.

---

विषय क्रमांक-१
दिनांक-१४/१०/२०२१
सूचक-उत्तम केंदळे

ठराव क्रमांक-८
विभाग- प्रशासन
अनुमोदक-कमलताई घोलप

संदर्भ- प्रशासन वि भागाकडील पत्र क्र. फक्षेका/२/कावि/११६/२०२१दिनांक १४/१०/२०२१ फ क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र.११ व प्रभाग क्र.१३ मधील खालील नमूद केलेल्या ठिकाणांना हॉकर्स झोन निश्चीतीस मान्यता देणेत येत आहे.

**प्रभाग क्रमांक ११.**

४) चेरी चौक स्पाईन रोड मधील जागा.
५) कृष्णा चौक स्पाईन रोड मधील जागा.
६) घरकुलमध्ये बसस्टॉपच्या मागील बाजूस .

**प्रभाग क्रमांक १३**

३) ठाकरे ग्राऊंडच्या बाजूला, यमुनानगर.
४) अंकुश चौक स्पाईन रोड मधील जागा.

सदरचा विषय सर्वानुमते मान्य करणेत आला.

---

विषय क्रमांक-२
दिनांक-१४/१०/२०२१
सूचक-संजय बबन नेवाळे

ठराव क्रमांक-९
विभाग- सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक-साधनाताई मळेकर

संदर्भ- सन्मा.सदस्य् प्रा. उत्तम प्रकाश केंदळे यांचा दिनांक १४/१०/२०२१ रोजीची प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक ११ मधील शरदनगर येथे हनुमान मदिर गल्ली क्रमांक ८ यास **"कै.तान्हाजी मारुती केंदळे (मा.पं.स.सदस्य, खेड तालुका ) चौक"** असे नामकरण करणेचे प्रस्तावास मान्यता देणे. उपरोक्त् नामकरणाचे प्रस्ताव मा.आयुक्त यांचेकडील परिपत्रक क्र.भूजि/९/कावि/९/२०२० दि.०२/०१/२०२० नुसार अमान्य करणेत आला.

सदरचा विषय सर्वानुमते अमान्य करणेत आला.

---

तद्नंतर मा. कुंदन अंबादास गायकवाड, सभापती यांनी सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, पदाधिकारी / अधिकारी यांचे आभार मानून प्रस्तुतची सभा संपल्याचे जाहीर केले.

K.A. Gaikwad

(कुंदन अंबादास गायकवाड)
सभापती
फ प्रभाग समिती
निगडी- 44

क्रमांक- फक्षेका/सभा/कावि/66 /2021     दिनांक- 25 /10/2021

(महेंद्र् चौधरी)
प्रशासन अधिकारी
तथा सचिव, सभा शाखा
फ प्रभाग समिती,
निगडी-44

प्रति,
सर्व संबंधित ----------------------